

# भूगोल, लेख-१

**सदाशिव पाटील, शाळा :** बालमोहन विद्यामंदिर, दादर

विद्यार्थी मित्रांनो,

प्रथम आपले सर्वांचे अभिनंदन! कारण आपण शालान्त परीक्षेच्या नवीन अभ्यासक्रमाचे मानकरी आहात. त्यामुळे आपण जिज्ञासू वृत्तीने व उत्साहाने अभ्यासाला सुरुवात केलेली आहे. हीच आपल्या उज्ज्वल यशाची नांदी असेल. वाचन, चिंतन, लेखन आणि प्रयत्नांतील सातत्य यांच्या बळावर आपण देदीप्यमान यश संपादन कराल. ही आपणा सर्वांना मनापासून सदिच्छा!

आपल्या यंदाच्या 'भूगोल' विषयाच्या पाठ्यपुस्तकात आपल्या भारत देशातील संसाधनांची माहिती दिलेली आहे. ही माहिती शालान्त परीक्षेबरोबरच पुढील इतरही महत्त्वपूर्ण परीक्षांसाठी उपयुक्त ठरेल. त्यामुळे वर्षभरात किमान चार ते पाच वेळा पाठ्यपुस्तकाचे बारकाईने वाचन करा. आकृत्या, आलेख, नकाशे यांचे उद्देश समजून घ्या. नकाशा भरण्याच्या कौशल्यावर भर द्या. तुमच्या मन:पटलावर आपल्या भारत देशाचा राजकीय आणि प्राकृतिक नकाशा कोरून ठेवा. त्यामुळे अनेक प्रश्नांची समर्पक उत्तरे देता येतील.

अत्यंत महत्त्वाच्या अशा शालान्त परीक्षेत तुमच्या इतर कौशल्यांपेक्षा प्रामुख्याने लेखनकौशल्यास जास्त महत्त्व आहे. त्यामुळे दररोज चांगले लेखन करण्याचा सराव करा. हस्ताक्षर सुंदर व लेखन शुद्ध ठेवा. लेखनशैली आकर्षक आणि गतिमान हवी. यासाठी कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही.

आज आपण आपल्या भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील पहिले प्रकरण 'भारत : संसाधने' हे प्रश्नोत्तर पद्धतीने अभ्यासणार आहोत.

**प्रकरण १ : भारत : संसाधने**

मानवी पर्यावरणामध्ये मानव, इतर संसाधने आणि त्यांचा उपयोग यांचा समावेश होतो. कृषी, पशुपालन, उद्योग, वाहतूक, संदेशवहन, व्यापार इत्यादींमुळे मानवी पर्यावरणाचा विकास होतो. मानवी गरजांची पूर्तता करण्याची क्षमता पर्यावरणातील घटकांत असते. तसेच त्यांची उपयुक्तता मात्र विज्ञान आणि तंत्रज्ञान यांवर अवलंबून असते. वाढत्या लोकसंख्येच्या गरजांच्या पूर्ततेसाठी संसाधनांचा उपयोग वाढविणे आवश्यक असते.

प्रकरणातील महत्त्वाचे मुद्दे :

- संसाधने (संकल्पना)
- संसाधनांचे गुणधर्म
- संसाधनांचे प्रकार
- संसाधनांचा विकास
- संसाधनांचे संधारण

**प्रश्नोत्तर पद्धतीने प्रकरणाची तयारी :**

**प्र.** : कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) संसाधनांचा उत्पादन खर्च ...... असल्यास त्याचा विकास जास्त होतो. (जास्त, मध्यम, कमी, समान)

२) ...... ही मानवकृत संसाधने आहेत. (वने, अवजारे, वन्यप्राणी, खनिजे)

३) संसाधनांचा विकास म्हणजे संसाधनांच्या वाढीबरोबर त्यांच्या ...... वाढ होणे होय. (मागणीत, वापरात, निर्मितीत, गुणवत्तेत)

**उत्तर** : (१) कमी (२) अवजारे (३) गुणवत्तेत

**प्र. :** पुढील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) 'मानवकृत संसाधने' म्हणजे काय ?

२) मानव एक स्वयंसंसाधन कोणत्या गुणांमुळे आहे ?

३) संसाधनांचा विकास कोणत्या घटकांवर अवलंबून असतो ?

**उत्तरे** :

(१) मानव आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी आपल्या कृतीतून ज्या साधनांची निर्मिती करतो त्यांना 'मानवकृत संसाधने' म्हणतात.

(२) ज्ञान, कल्पकता, बुद्धिमत्ता, दूरदृष्टी, निर्णयक्षमता, कौशल्य, नेतृत्व इत्यादी गुणांमुळे मानव एक स्वयंसंसाधन आहे.

(३) संसाधनांचा विकास मानवाची बौद्धिक क्षमता, कौशल्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांवर अवलंबून असतो.

**प्र.** : पुढील विधानांची भौगोलिक कारणे लिहा.

१) संसाधनांच्या संधारणाची गरज निर्माण झाली आहे.

**उत्तर :**

- प्रत्येक संसाधनाची उपयुक्तता मर्यादित असते.
- संसाधनांचा अयोग्य व अतिरिक्त वापर यांमुळे काही संसाधने नष्ट होतात तर काही संसाधने वापरण्यास निरुपयोगी ठरतात म्हणून संसाधनांच्या संधारणाची गरज निर्माण झाली आहे.

२) विकसित राष्ट्रांत संसाधनांचा उपयोग जास्त आढळतो.

**उत्तर :**

- संसाधनांची उपयुक्तता मानवाने परिश्रमाने, विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या उपयोगाने वाढवली आहे.
- विकसित राष्ट्रांमधील बौद्धिक क्षमता, कौशल्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान इत्यादींची पातळी उच्च असते म्हणून विकसित राष्ट्रांत संसाधनांचा उपयोग जास्त आढळतो.

**प्र. :** पुढील प्रश्नांची प्रत्येकी थोडक्यात उत्तरे लिहा.

१) 'नैसर्गिक संसाधने' म्हणजे काय ?

**उत्तर :** जी संसाधने निसर्गात नैसर्गिक स्थितीत उपलब्ध असतात, त्यांना 'नैसर्गिक संसाधने' म्हणतात. भूमी, हवामान, मृदा, पाणी, वनस्पती, वन्यप्राणी, खनिजे इत्यादी नैसर्गिक संसाधने आहेत.

२) आपण वैयक्तिक पातळीवर संसाधनांचे संधारण कसे करू शकतो ?

**उत्तर :**

- वस्तू व सुविधांची आवश्यकता नसताना त्यांचा वापर किंवा स्वीकार न करणे.
- वस्तू आणि सुविधांचा योग्य वापर करणे.
- वस्तूंचा पुनर्वापर करणे.

अशा प्रकारे वैयक्तिक पातळीवर संसाधनांचे संधारण करावे.

**प्र.** : टिपा लिहा : संसाधनांचा विकास

**उत्तर :** १) संसाधनांचा विकास :

- संसाधनांची मागणी वाढते तेव्हा संसाधनांचा विकास होतो.
- संसाधनांचा विकास म्हणजे संसाधनांच्या वाढीबरोबर त्यांच्या गुणवत्तेत वाढ होणे होय.
- संसाधनांचा विकास मानवाची बौद्धिक क्षमता, कौशल्य, विज्ञान व तंत्रज्ञान यांवर अवलंबून असतो.
- संसाधनांचा निर्मिती खर्च कमी असल्यास त्यांचा विकास जास्त होतो.
- संसाधनांच्या विकासासाठी राजकीय स्थैर्य, शांतता, सामंजस्य व अनुकूल राष्ट्रीय धोरण यांची आवश्यकता असते.

**प्र.** : सविस्तर उत्तर लिहा.

१) संसाधनांच्या संधारणासाठी कोणकोणते उपाय योजावेत ?

**उत्तर :** संसाधनांचा अयोग्य वापर आणि विनाश टाळण्यासाठी त्यांचे काळजीपूर्वक केलेले व्यवस्थापन म्हणजे 'संधारण' होय. संसाधनांच्या संधारणासाठी उपाययोजना पुढीलप्रमाणे-

- संसाधनांचा वापर व मागणी कमी होण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण व्हावे.
- भावी पिढ्यांच्या पूर्ततेसाठी संसाधने राखून ठेवणे.
- पर्यायी स्वस्त संसाधननिर्मिती करावी. तसेच संसाधनांचे पुनर्चक्रीकरण करावे. नूतनीक्षम संसाधने वाढविणे.
- संसाधनांच्या संरक्षणासाठी कायदे करणे.
- विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करून संसाधनांची उपयोगिता वाढविणे.
- संसाधनांच्या संधारणासाठी सामाजिक जाणीव व जागृती निर्माण करणे.

२) संसाधनांचे गुणधर्म लिहा.

**उत्तर :** संसाधनांचे निश्चित असे गुणधर्म पुढीलप्रमाणे आहेत-

- काही संसाधने निसर्गात नैसर्गिक स्थितीत उपलब्ध असतात.
- काही संसाधने मानवी कृतींमधून केलेल्या प्रक्रियांमुळे तयार होतात.
- काही संसाधने नूतनीक्षम तर काही अनूतनीक्षम असतात.
- प्रत्येक संसाधनाची उपयुक्तता मर्यादित असते.
- वस्तू व सेवा या दोन्ही स्वरूपात संसाधनांचा उपयोग होतो.
- आपण अधिक प्रयत्नशील असल्यास संसाधनांची उपयुक्तता वाढते.
- विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या विकासानुसार संसाधनांच्या उपयुक्ततेचे स्वरूप बदलते.

**उद्याचा विषय : विज्ञान ।**

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com